मुकुंद रामचंद्र ओढेकर

बी.कॉम एलएल.बी. ॲडव्होकेट,
सर्व्हे नंबर 575, प्लॉट क्रमांक 3 शिवदुर्गा बंगलो,डॉ.होमी
भाभानगर,नाशिक-11 मोबाईल नंबर 9325668069

दिनांक 01/01/2018

टायटल रिपोर्ट

प्रति,
योगेश्वर रिअल्टी तर्फे भागीदार
मधुभाई बाबुभाई कोठीया व इतर
रा. नासिक

महोदय,

मिळकतीचे वर्णन- तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालूका नाशिक पैकी नाशिक महानगरपालीका हद्दीतील, रहिवाशी विभागात समाविष्ट असलेली शहर नासिक येथील रेव्हेन्यू सर्व्हे नंबर 907/2/1/अ यांसी भुखंड क्रमांक 2+3अ व सर्व्हे नंबर 907/2/1/अ यांसी भुखंड क्रमांक 2+3ब यांसी प्रत्येकी क्षेत्र 500.50 चौ.मी. असे एकूण क्षेत्र 1001.00 चौ.मी. यांसी चतुःसिमा

भुखंड क्रमांक 2+3अ

पुर्वेस - भुखंड क्रमांक 8 व 9 च्या मिळकती
पश्चिमेस - 18 मिटर डी.पी. रोड
दक्षिणेस -भुखंड क्रमांक 2+3ब ची मिळकत
उत्तरेस -भुखंड क्रमांक 01 ची मिळकत

भुखंड क्रमांक 2+3ब

पुर्वेस - भुखंड क्रमांक 6,7 व च्या मिळकती
पश्चिमेस - 18 मिटर डी.पी. रोड
दक्षिणेस -भुखंड क्रमांक 2+3क ची मिळकत
उत्तरेस -भुखंड क्रमांक 2+3अ ची मिळकत

येणेप्रमाणे जलतरू, काष्टपाषाण, निधिनिक्षेप तदंगभुत वस्तुंसह तसेच कॉलनीरोडस् व ले-आऊटमधील सामाईक सुविधा वापरण्याचे हक्कासह चतुःसिमेतील दरोबस्त बिनशेती भुखंडाची मिळकत

योगेश्वर रिअल्टी तर्फे भागीदार मधुभाई बाबुभाई कोठीया व इतर यांनी खाली नमूद केलेल्या कागदपत्रानुसार टायटल देत आहे.

1.7/12 उतारे, 2. 6-ड च्या नोंदी 3.बिनशेती परवानगी 4. ले-आऊट मंजूरीचे पत्र 5. ले-आऊट प्रत 6.खरेदीखते व नोंदणी पावती 7. कमेन्समेंट सर्टिफिकेट 8. बिल्डींग प्लॅन

नोंद क्रमांक 8152 दिनांक 22/3/1952 गणपत रामजी आव्हाड हे दिनांक 9/9/58 रोजी नासिक येथे मयत झाले त्यांना वारस खालीलप्रमाणे 1. सदाशिव गणपत आव्हाड उ.व. 52 2. नोंद पुसट आहे गणपत आव्हाड उ.व. 40 मुलगी नोंद पुसट आहे मर्द बाबुराव गामणे व पत्नी नोंद पुसट आहे गणपत आव्हाड उ.व. 80 नोंद पुसट आहे लावले आहे वारसांचे नांवे दाखल करणेकामी नेांद केली असे नोंद अर्ज व प्रतिज्ञापत्रावरून केली असे.

नोंद क्रमांक 8215 दिनांक 10/6/1952 हिस्सा फॉर्म 12 प्रमाणे मे. सर्वे मामलेदार साहेब (पो.हि.स)नासिक यांचे हुकूम नंबर 0/21/59 प्रमाणे सन 1956 चे पत्रका प्रमाणे खालीली फेरफार केले. सर्व्हे नंबर 907/1 त्र्यंबक अर्जून गामणे 907/2 मुरलीधर काशिनाथ गामणे येणे प्रमाणे नोंद केली.

नोंद क्रमांक 8294 दिनांक हिस्सा फॉर्म नंबर 12 सन 1956 नोंद पुसट आहे येणेप्रमाणे नोंद केली असे.

नोंद क्रमांक 12378 महाराष्ट्र राज्याचा वजन मापन सबंधीचा कायदा महाराष्ट्र राज्याचा वजनमापा सबंधीचा कायदा [Enforcement Act]1958 व भारतीय नाणी कायदा [Indian Coinage Act] अन्वये गांवचे हक्क नोंद कागदी अंमल देणेसाठी मे.वि.जि.नि.भुमी अभिलेख/दशमान ठाणे मुलूंड यांचेकडून परिणामात रूपांतर आकरबंद व हिस्सा फॉर्म नंबर 12 गांव वहिवाटीस आलेवरून त्याचा गांवी अंमल देणेसाठी नोंद केली असे.

नेांद क्रमांक 21180 ले-आऊट बाजूस दाखल केलेले श्री मुरलीधर गामणे यांचे नांवावर आहे अर्बन लॅन्ड सिंलीग नोंद पुसट आहे फायनल झाल्याने ले-आऊट प्रमाणे नोंद केली आहे.(नोंद पुसट आहे)

MUKUND R. ODHEKAR Regd.No. MAH/1467/2000 ADVOCATE

नोंद क्रमांक 31161 दिनांक 21/10/1993 हुकूमावरून बाजूस दाखल केलेली मिळकत मुरलीधर काशिनाथ गामणे यांचे नावांवर असून ना.ज.क.म. 2848/199/24/8/1993 अन्वये अतिरिक्त घोषित करण्यात आला आहे हुकूमावरून नोंद केली असे.

नोंद क्रमांक 31267 दिनंका 24/11/1993 वारसाने मुरलीधर काशिनाथ गामणे हे ता. 29/3/1991 रोजी मयत झाले त्यांना वारस खालीलप्रमाणे-

वारसांचे नांव	वय	नाते
1.दगू मुरलीधर गामणे	35	मुलगा
2.शिवाजी मुरलीधर गामणे	33	मुलगा
3.केशव मुरलीधर गामणे	30	मुलगा
4.बबन मुरलीधर गामणे	28	मुलगा
5.भिमा मुरलीधर गामणे	20	मुलगा
6.तुळसाबाई मुरलीधर गामणे	60	पत्नी
7.कौसल्या चिंतामण भाबड	40	मुलगी
8.ठकुबाई बाळू गिते	38	मुलगी
9.लंकाबाई मधु सानप	27	मुलगी
10.विठाबाई शिवाजी वाघ	22	मुलगी

अर्ज व प्रतिज्ञापत्रावरून नोंद केली असे.

नोंद क्रमांक 43830 दिनांक 3/3/2001 रोजी बोजा कमी बाजूस दाखल केलेल्या मिळकतीचे इतर हक्कात दि. नासिकरोड देवळाली व्यापारी सहकारी बॅंक यांचा बेाजा रूपये 216000/- चा दाखल केला असून तो कमी करावा असे बॅंकेचे पत्र भिमराव मुरलीधर गामणे यांनी हजर केल्यावरून इतर हक्कांतील बॅंकेचा बोजा कमी केला असे नोंद बॅंकेचे पत्रावरून केली असे.

नोंद क्रमांक 51471 दिनांक 7/8/2004 रोजी अर्ज व ले-आऊट वरून बाजूस दाखल केलेल्या मिळकतीपैकी क्षेत्र 7500.00 चौ.मी. जमिन मालक दगू मुरलीधर गामणे व इतर यांनी ले-आऊट तयार करून तो नासिक म.न.पा. नासिक यांचेकडील जा.नं. /नगररचना विभाग /अंतिम/बी-4/66 दिनांक 23/7/2004 रोजी मंजूर करून घेवून मा.

जिल्हाधिकारी साहेब नासिक यांचेकडील आदेश क्रमांक मह/कक्ष-3/4/ बि. शे. प. क्र. /129 /2004 दिनांक 19/7/2004 अन्वये बिनशेती परवानगी घेतल्याने खालीलप्रमाणे भुखंड क्रमांक 1 ते 19 भुखंड क्रमांक 20 ओपन स्पेस, भुखंड क्रमांक 21 एमएसईबी, भुखंड क्रमांक 22 कॉलनीरोड वरीलप्रमाणे प्लॉट दाखल करून उर्वरित क्षेत्रास हिस्सा ब दाखल केला नोंद अर्ज व ले-आऊट व बिनशेती आदेशावरून केली असे तसेच कॉलनी रोड, ओपन स्पेस उतारे म.न.पा.चे नावे दाखल केले असे.

नोंद क्रमांक 51925 दिनांक 25/10/2004 रोजी खरेदीने बाजूस दाखल केलेल्या मिळकती 1. दगू मुरलीधर गामणे 2. शिवाजी मुरलीधर गामणे 3. केशव मुरलीधर गामणे 4. बबन मुरलीधर गामणे 5.भिमा मुरलीधर गामणे 6. तुळसाबाई मुरलीधर गामणे 7. कौसल्या चिंतामण भाबड 8.ठकुबाई बाळू गिते 9. लंकाबाई मधु सानप 10 विठाबाई शिवाजी वाघ सर्वातर्फे विराज इस्टेट प्रा.लि. तर्फे संचालक विलास रसिकलाल शाह यांचे ज.मु. चंद्रशेखर बाबुलाल शाह यांनी खालीलप्रमाणे विक्री केल्यात.

अ.सर्व्हे नंबर 907/2/1अ प्लॉट क्रमांक 2 यांसी क्षेत्र 836.00 चौ.मी. खरेदी किंमत रूपये 475000/- दिनांक 4/10/2004 खरेदी घेणार डॉ. गितांजली भास्कर‌राव धस

ब.सर्व्हे नंबर 907/2/1अ प्लॉट क्रमांक 3 यांसी क्षेत्र 836.00 चौ.मी. खरेदी किंमत रूपये 475000/- दिनांक 4/10/2004 खरेदी घेणार डॉ. गितांजली भास्कर‌राव धस वरीलप्रमाणे खरेदी घेतल्या असून मिळकती बिनशेती असून ना.ज.क.म. परवानगी घेतली आहे. नोंद अर्ज व खरेदीखताचे नकलेवरून केली असे.

नोंद क्रमांक अ-291 दिनांक 3/2/2016 वर्दीप्राप्त दिनांक 3/2/16 अर्ज एकत्रिकरण नकाशा खालील बाजूस दाखल केलेल्या मिळकती बाबत सहा. तथा नगररचना नासिक महानगरपालीका नासिक यांनी त्यांचे पत्र क्रमांक जा.नं./नगररचना विभाग /अंतिम /सिडको/ बी-5/04/दिनांक 8/5/2013 अन्वये विभाजन नकाशा मंजूर केला आहे.

7/12 नुसार	एकत्रिकरणानुसार
स.नं.907/2/1अ प्लॉट क्रमांक 2 क्षेत्र 836.00 चौ.मी.	स.नं.907/2/1अ प्लॉट क्रमांक 2+3 यांसी क्षेत्र 1672.00 चौ.मी. वरीलप्रमाणे एकत्रिकरण करून त्यांचे विभाजन मंजूर करून
स.नं. 907/2/1अ प्लॉट क्रमांक 3 क्षेत्र 836.00 चौ.मी. असे एकूण क्षेत्र 1672 चौ.मी.	प्लॉट क्रमांक 2+3अ क्षेत्र 671 चौ.मी. व प्लॉट क्रमांक 2+3ब यांसी क्षेत्र 500.50 चौ.मी. व प्लॉट क्रमांक 2+3अ चे क्षेत्र 500.50 चौ.मी.

वरीलप्रमाणे विभाजनाप्रमाणे नोंद केली असे.

योगेश्वर रिअल्टी तर्फे भागीदार मधुभाई बाबुभाई कोठीया व इतर यांनी दिनांक 29/03/2017 रोजी डॉ. गितांजली भास्कर्राव धस उर्फ डॉ. गितांजली भास्कर्राव गरिमा यांचेकडून सर्व्हे नंबर 907/2/1/अ पैकी यांसी भुखंड क्रमांक 2+3अ यांसी क्षेत्र 500.50 चौ.मी.ही मिळकत खरेदी घेतली असून सदरचे खरेदीखत मे. सह दुय्यम निबंधक साहेब वर्ग-2 नासिक-7 यांचे कार्यालयात दस्त क्रमांक 171 दिनांक 30/03/2017 अन्वये नोंदविले असून खरेदीखतानुसार योगेश्वर रिअल्टी तर्फे भागीदार मधुभाई बाबुभाई कोठीया व इतर यांनी नासिक तलाठी यांचे कार्यालयात नांव लावणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

योगेश्वर रिअल्टी तर्फे भागीदार मधुभाई बाबुभाई कोठीया व इतर यांनी दिनांक 29/03/2017 रोजी डॉ. गितांजली भास्कर्राव धस उर्फ डॉ. गितांजली भास्कर्राव गरिमा यांचेकडून सर्व्हे नंबर 907/2/1/अ पैकी यांसी भुखंड क्रमांक 2+3ब यांसी क्षेत्र 500.50 चौ.मी.ही मिळकत खरेदी घेतली असून सदरचे खरेदीखत मे. सह दुय्यम निबंधक साहेब वर्ग-2 नासिक-7 यांचे कार्यालयात दस्त क्रमांक 172 दिनांक 30/03/2017 अन्वये नोंदविले असून खरेदीखतानुसार योगेश्वर रिअल्टी तर्फे भागीदार मधुभाई बाबुभाई कोठीया व इतर यांनी नासिक तलाठी यांचे कार्यालयात नांव लावणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

योगेश्वर रिअल्टी तर्फे भागीदार मधुभाई बाबुभाई कोठीया व इतर यांनी त्यांचे लाभातील खरेदीखतानुसार बांधकाम परवानगी मिळणेकामी नाशिक महानगरपालीका नाशिक कार्यकारी अभियंता यांनी निवासी व वाणिज्य बांधकाम परवानगी क्रमांक एलएनडी /बीपी/बी-5/7381 दिनांक 18/10/2017 रोजी परवानगी मिळविली होती त्यानुसार रिव्हाईज बांधकाम परवानगी क्रमांक एलएनडी /बीपी/बी-5/290 /10525 दिनांक 13/12/2017 अन्वये बांधकामास परवानगी दिली आहे.

टी.डी.आर. फोलिओ नंबर 742 दिनांक 20/01/2017 वापरण्यात येणारे हस्तांतरणीय विकास हक्क टी. डी. आर. क्षेत्र 528.11 चौ.मि. वापर केला आहे.

वरील प्रमाणे मौजे आडगांव सर्व्हे नंबर 907/2/1/अ यांसी भुखंड क्रमांक 2+3अ व 2+3ब यांसी एकूण क्षेत्र 1001.00 चौ.मी. या भुखंडाच्या मिळकती निर्वेध व बिनबोजाच्या असून सदर मिळकर्तीचे टायटल स्वच्छ व निर्दोष आहे.कळावे

मुकूंद रामचंद्र ओढेकर

ॲडव्होकेट

Adv.Mukund Ramchandra Odhekar
B.Com. LL.B
Shivdurga Bungalow, S.No.575,
Plot No.3, Dr. Bhabha Nagar, Nasik.
Mobile :- 93256 68069